**<u>शिस्तभंगविषयक कारवाई</u>**

शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर तात्काळ संपुष्टात आणण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: वशिअ-१२१८/प्र.क्र.६१/११**

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : ३१ मे, २०१८

## परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदींन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येते. शिस्तभंगाची कारवाई सुरू असताना शासकीय कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्यासंदर्भात वरील नियमांतील नियम १३(चार) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद विहित केली आहे:

**" अपचारी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर शिस्तभंग कारवाई तात्काळ संपुष्टात येते. त्यामुळे या नियमांखालील कोणतीही शिस्तभंग कारवाई संबंधित अपचारी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर चालू ठेवता येणार नाही."**

२. वरील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई चालू असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्याविरुद्धची कारवाई तात्काळ संपुष्टात आणणे आवश्यक आहे. शासन शिस्तभंगविषयक प्राधिकारी असलेल्या प्रकरणी अशी कारवाई संपुष्टात आणण्याचे प्रस्ताव सहमतीसाठी प्रथम सामान्य प्रशासन विभागास सादर केले जातात. सामान्य प्रशासन विभागाची सहमती प्राप्त झाल्यावर त्यास शासनाची मान्यता घेतली जाते. या प्रक्रियेत काही कालावधी जातो व चौकशी संपुष्टात आणण्यास विलंब होतो. त्यामुळे निधन पावलेल्या कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीविषयक लाभ मिळण्यास उशीर होऊन त्याच्या कुटुंबियांची गैरवाजवी अडचण होते.

३. वरील बाब विचारात घेऊन आता अशा सूचना देण्यात येत आहेत की, शिस्तभंगाची कारवाई सुरु असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास, आवश्यक ती खातरजमा करुन सदर कारवाई संपुष्टात आणण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सहमतीसाठी सामान्य प्रशासन विभागास सादर न करता शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्या स्तरावर मान्यतेसाठी सादर करावा.

शासनास दुय्यम असणाऱ्या शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनीदेखील कर्मचाऱ्याच्या निधनानंतर त्याच्याविरुद्धची शिस्तभंगविषयक कारवाई संपुष्टात आणण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

सदर शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५३११८३५१०८५०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramakant Shivajirao Ghatge

Digitally signed by Ramakant Shivajirao Ghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=G.A.D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=927f16b596a85f3f04b621916641eefd1bb6b4367c467eb0b061a30ce41ba8ec, cn=Ramakant Shivajirao Ghatge
Date: 2018.06.01 10:34:12 +05'30'

(र.शि.घाटगे)
अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव,
२. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
३. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
५. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा,
६. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद,
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
९. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१५. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१६. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१७. *सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
१८. *सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
१९. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०. *आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२२. सर्व विधीमंडळ सदस्य,
२३. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२४. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५. निवडनस्ती
२६. *पत्राने